ती मुलगी जिने आपली स्वप्नं एका डब्यात पुरली



मराठी : अश्विनी बर्वे

डॉ. ट्रेंट

ही एका छोट्या मुलीची कहाणी आहे जिने मोठी स्वप्नं बघितली होती.

त्या मुलीला फक्त शिक्षण हवं होतं. पण रोडेशियामध्ये मुलींसाठी शिक्षण जवळजवळ अशक्य होतं. म्हणून ती आपल्या भावाची शाळेतली पुस्तकं वाचायला-लिहायला शिकली आणि गुरं चरत असतांना ती मोजायला शिकली.

जेव्हा ती मुलगी एक तरुण पत्नी आणि आई झाली, तेव्हा तिने आपलं लक्ष्य कागदाच्या तुकडांवर लिहलं आणि ते एका डब्यात टाकून, तो मातीत पुरला. ही एक प्राचीन आफ्रिकी रूढी होती जी तिला नेहमी आठवण देत असे की ती आपली स्वप्नं कधीच सोडू शकत नाही.

तिने अमेरिकेत जावून एक डिग्री घेण्याचं स्वप्नं पाहिलं होतं. मग दुसरं अजून मोठं स्वप्नं पाहिलं. आणि शेवटी तिने आपल्या गावातल्या सगळ्या मुला-मुलींना शिक्षण दिलं.

ती मुलगी जिने आपली
स्वप्नं एका डब्यात पुरली





तिला एक मुलगा समजलं गेलं होतं.आई-वडिलांनी तिचे एक सम्मानजनक शोना मुलांचे नाव ही निवडले होते,ज्याचा अर्थ होता "आत्माचा आवाज ऐक."

पण त्या थंडीच्या सकाळी एका छोटे गाव जे आता झिम्बाव्वे मध्ये आहे, ती सूर्योदयाच्या वेळच्या छान आगीच्या गोळ्यासारखी ती जन्मला आली.


मुलीच्या आजीने लवकरच तिची जन्म नाळ कापली आणि ती आईच्या फाटलेल्या कपड्यामध्ये ठेवत ते कापड करकचून बांधलं. मग तिने ते कापड लाल धरतीच्या खाली गाडलं.

“ही आपली प्राचीन रीत आहे,” आजी म्हणाली. “ज्या बाळाची जन्म नाळ जमिनीत गाडली जाते ते नेहमी आपल्या घराची आठवण ठेवते.”





छोटी मुलगी एका झोपडीत वाढली-मोठी झाली. घराचे छप्पर घासाचे होते आणि त्याचं दार मातीचे होते.

रोज ती मुलगी कुटुंबाची गुरं सांभाळत असे आणि अनेक मैलावरून पाणी आणि जळण्यासाठी लाकडं आणत असे. कधी-कधी तिला शाळेच्या रस्त्यात पुस्तके घेतलेली मोठी मुलं दिसत असत. ओह, किती छान होईल त्यांनी त्यांची पुस्तकं मला दिली आणि माझ सरपण त्यांनी घेतलं तर



पण तिच्या गावातल्या अधिकांश छोट्या मुलींसाठी शिकणे आणि शाळेत जाणं “अशक्य” होतं. जर कुटुंबाकडे पैसे असतील तर ते आपल्या मुलग्यांना शाळेत पाठवत. मुलींना घरी स्वयंपाक करावा लागे, सफाई करावी लागे आणि पाणी, लाकडं आणायला लागत.





छोट्या मुलीच्या घरातल्या प्रत्येक महिलेने “अशक्य” शब्द ऐकला होता. त्यापेक्षा अधिक दुःखदायक अजून काही नव्हते, जेव्हा छोट्या मुलीने आपल्या काकुच्या डोळ्यात पाणी पाहिले, कारण ती आपल्या पतीचे पत्र वाचू शकत नव्हती. कोण्या अनोळखीकडून पत्र वाचून घेण्याशिवाय तिच्याकडे कोणताही पर्याय नव्हता.

“हे व्हायला नको!” छोटी मुलगी आपल्या आई आणि आजीवर ओरडली.

महिलांनी त्या मुलीचे म्हणणे मान्य केले.

तिची आजी म्हणाली, “आपल्याला वाचण्यासाठी आणि लिहिण्यासाठी एका तरुण मुलीच्या डोळ्यांची गरज आहे.”

“कदाचित ती तू हो!”

छोट्या मुलीने ठरवले की ती त्यांचे डोळे होईल. ती वाचायला आणि लिहायला नक्की शिकेल.

तिने आपल्या भावाची शाळेची पुस्तके उधार घेतली आणि त्याची पानं उलटली. पुस्तकाची पाने हसणारी माणसं, मोठी शहरं आणि उंच इमारतींच्या चित्रांनी भरलेली होती.

तिच्या भावाने, तिनशेने त्या पुस्तकाचे अजब नाव घेतले - भूगोल. त्या शब्दांनी मुलीच्या जिभेला गुद्गुद्गुल्या केल्या.

“मी तुला वाचायला-लिहायला शिकवेन,” भाऊ म्हणाला. “पण तू ही गोष्ट गुप्त ठेवायला हवी. आणि त्या बदल्यात तुला काही करावे लागेल.”

छोटी मुलगी हसली आणि तिने वचन दिले.







तिनशेने छोट्या बहिणीला शोना पद्धीतीने म्हणजे गाण्याच्या माध्यमातून वाचायला शिकवले.

ती स्वर आणि व्यंजन शिकली. आपल्या भावाच्या स्वाध्यायपुस्तकातून प्रत्येक अक्षर समजून घेतले आणि ती त्याचा ध्वनी गाऊन शिकली.

ज्याप्रकारे ती गोधडी करण्यासाठी कपडा शिवायला शिकली, त्याप्रकारे छोटी मुलगी शब्द तयार करण्यासाठी स्वर आणि व्यंजनाला एकत्र शिवायला शिकली. ओह, अक्षरांनी ज्याप्रकारे शब्द निर्माण केले, त्यात कसे रहस्य लपलेले असते. आणि ज्याप्रकारे शब्द कहाणी विणतात, त्यात सुद्धा शब्दांचे रहस्य लपलेले असते. कधी-कधी ती आपल्या अभ्यासात एवढं लक्ष केंद्रित करायची की ती गुरांकडे बघणं विसरून जायची. ती त्यांना फिरायला आणि शेजारच्या मक्याच्या शेतात चरायला सोडून देत असे.






छोट्या मुलीला शिकायला इतकं आवडत होते की शाळेचा दिवस संपे पर्यंत ती स्वतःला रोखू शकत नव्हती. मक्याचे शेत तिचा वर्ग झाला, आणि गुरं तिचे विद्यार्थी झाले. तिने आपल्या विद्यार्थांना नावं दिली आणि तिने त्यांना विज्ञान आणि गणित शिकवले–जे तिचे आवडीचे विषय होते. जेव्हा ती गुरं चरण्याच्या वेळी गणितं सोडवत असे तेव्हा गावातली इतर मुलं तिच्याकडे इशारा करत म्हणत, “ती गुरांना शिकवण्याचा प्रयत्न करत आहे,” ते म्हणत, “गुरं कधीही शिकू शकत नाही.”



जेव्हा मुलगी शाळेत जाऊ लागली त्यानंतर लगेचच तिचं गाव बदलू लागलं.

युद्ध आणि दुष्काळामुळे गावातील पुरुषांना शहरातील कारखान्यांकडे आणि पहाडा जवळच्या सोन्याच्या खाणी कडे ढकलले. जेव्हा ते परत येत तेव्हा ते मोठ्या पानांच्या झाडाखाली आराम करत असत. ते झाडाच्या फांद्यांना बॅटरीवर चालणारा रेडिओ अडकवत आणि जगभरच्या बातम्यांचा आनंद घेत असत.

छोटी मुलगी आपला गृहपाठ करते वेळी त्या बातम्या ऐकत असे. रेडिओचे कार्यक्रम त्या मुलीला दूर-दूर घेवून गेले. ऑस्ट्रेलिया! यूरोप! अमेरिका! ती विचार करे, ती कधी ते देश आणि शहरं बघू शकेल.




चंद्र उगवत होता आणि मावळत होता, हळू-हळू छोटी मुलगी एक युवती,एक पत्नी आणि आई झाली. तिचं गाव पण काहीसं नवं झालं. युद्ध समाप्ती मुलं आणि मुलींच्या पुढच्या पिढीसाठी आशा आणि परिवर्तन घेवून आली.

प्रत्येक वेळी जेव्हा ती आपल्या मुलांना शाळेत पाठवा तेव्हा तरुण आईचा उत्साह वाढत असे. ज्या प्रेमाने ती त्यांना खाऊ घाले त्याच प्रेमाने ती त्यांना शिकायला प्रेरित करत असे.





इतर लोकांनी सुद्धा तिचे स्वप्न साकार होण्यासाठी मदत केली. झिम्बाव्वेने दूरवरच्या शिक्षित पुरुष आणि स्त्रियांचे स्वागत केले. जे तरुण आईच्या गावाच्या बाबत अधिक जाणून घेण्यासाठी इतर देशातून येत होते. एका गोष्टीचा तरुण आईवर फार प्रभाव पडला. अमेरिकेत पुरुष आणि महिला दोघेही आपल्या आवडीचे विषयांचे अध्ययन तोपर्यंत करू शकत होते, जोपर्यत त्यांना आवडत होते.



तिला अजून काही समजण्याच्या आधी तिचे स्वप्नं अजून मोठं झालं होतं. ती पुढच्या शिक्षणासाठी अमेरिकेत जाणार होती.

जो-लक नावाच्या एका दयाळू महिलेने त्या तरुणीला आधार दिला होता.

“जर तू खरंच हे स्वप्न साकार करू इच्छिते,” ती म्हणाली, “तर ते प्राप्त करणं शक्य होईल.”

“ते प्राप्त करणं शक्य होईल?” तरुणीने परत विचारलं. "टिनोगोना!" ती शोना भाषेत कुजबुजली.

स्वप्नं पाहणाऱ्यासाठी ते किती शक्तिशाली शब्द होते.





तरुणी ती खुशखबर आपल्या आईला सांगण्यासाठी पळाली.

“तू आपली स्वप्नं लिहिली पाहिजे आणि त्यांना जमिनीत पुरलं पाहिजे,” तिच्या आईने सुचवलं. “धरती आई त्यांना वाढण्यासाठी मदत करेल.”

ही एक प्राचीन प्रथा होती, ते जन्म नाळ पुरण्यासारखे होते.

"आपली स्वप्नं साकार करण्यासाठी पुऱ्या जगावर भरोसा ठेव बाळा.”

तरुणीने लगेच कागदाच्या तुकड्यावर चार स्वप्नं लिहिली: अमेरिकेचा प्रवास, एक पदवी मिळवणे, मग दुसरी, मग तिसरी पदवी आणि त्यानंतर सगळ्यात उच्चतम पदवी मिळवणे.

तिने कागद एका जुन्या टीनच्या डब्यात ठेवून दिला.

“थांब!!“ तिची आई ओरडली. “मुली तुझ्या स्वप्नांना काहीच अर्थ राहणार नाही, जोपर्यंत तू आपल्या लोकांसाठी काही भेट परत देत नाही. आपल्या लोकांची नेहमी आठवण ठेव.”

मग तरुणीने पाचवं स्वप्नं जोडलं: आपल्या गावाला शिक्षणाची भेट देणे. त्यानंतर तिने आपला डबा त्याच शेतात पुरला. जिथं ती आपली गुरं चरतांना बघायची.


"टिनोगोना!" ती गायली.

तो तिच्यासाठी एक विशेष दिवस होता, त्यादिवशीत्या तरुणीसाठी एक अजब तिकीट आणि एका विश्वविद्यालयाचा शिक्का असणारे एक पत्र पोस्टाने आलं होतं. अनेक वर्षांचा अभ्यास आणि भरपूर मेहनती नंतर आता ती शेवटी अमेरिकेत जाणार

तिची बॅग भरण्याआधी त्या मुलीला प्रवासासाठी अजून पैशांची गरज होती.ते तिला कसे मिळणार?

तरुणीची आई गावच्या प्रमुखाला भेटायला गेली.गावचा प्रमुख त्या तरुणीचा आणि तिच्या दाबून ठेवलेल्या स्वप्नांचा खूप सन्मान करत होता.

त्या तरुणीला न सांगता, प्रमुखाने प्रत्येक गावकऱ्याला सांगितलं होतं की, त्या मुलीचा प्रवास सुलभ करण्यासाठी जे करता येईल ते करा. काहींनी तिला मदत करण्यासाठी आपल्या कोंबड्या, भुईमुगाच्या शेंगा विकल्या. दुसऱ्यांनी आपलं प्रेम आणि पाठिंबा दाखवण्यासाठी पैशांच्या रुपात मदत केली. आता त्या मुलीचे स्वप्नं सत्यात येणार होतं.





जेव्हा तरुणी, अमेरिकेत जाणाऱ्या विमानात चढली,तेव्हा तिने आपल्या आईचा विचार केला. जेव्हा तिच्या शाळेचा पहिला दिवस सुरु झाला तेव्हा तिने आपल्या भावाचा चेहरा आठवला. उशिरा रात्री पर्यंत ती विश्वविद्यालयाच्या वाचनालयात ती वाचत असे तेव्हा तिला आपलं गाव आठवत असे. जेव्हा ती आपल्या मुलांच्या जेवणासाठी संघर्ष करत होती तेव्हा तिला जो-लकचे शब्द आठवले. आणि जेव्हा तिला वाटे की तिचं स्वप्नं हातातून निसटत आहे तेव्हा ती कुजबुजे, "टिनोगोना."





तिला प्राप्त करणे शक्य झाले.

तरुणीने एका नंतर एक पदव्या मिळवल्या.

आणि शेवटी तिचं स्वप्नंही पूर्ण झालं. तिने झिम्बाव्वेमध्ये छोट्या मुली आणि मुलांसाठी शिक्षण आणलं, जसे की तिने काही वर्षापूर्वी वचन दिले होते.



प्रिय वाचक,


ग्रामीण रोडेशिया (जो आज झिम्बाब्वे नावाने ओळखला जातो) मध्य पालन पोषण झालेली एका तरुण मुलीच्या रुपात माझं जीवन गरिबी, कंबर मोडून पडेल एवढे कष्ट आणि युद्धाची तीव्र भयानक स्थितीमध्ये आकाराला येत होते. पण शाळा आणि पुस्तकांनी मला एक नवीन जग दाखवले. एक जादूमय जागा जिथं कुपोषण आणि हिंसा दैनंदिन जीवनाचा हिस्सा नव्हता. मला जे जीवन हवं होतं- एक असं जीवन जिथं मला शिक्षण, खाण्यासाठी भरपूर काही आणि शांतता मिळेल. माझ्या आईने आणि आजीने मला विश्वास दिला की माझ्याजवळ स्वतःला आणि जगाला बदलण्याची ताकद आहे. आणि नंतर जो-लक – एका अमेरिकी कार्यकर्तीने मला एक असा शब्द शिकवला ज्याने मला रस्ता दाखवला- ते प्राप्त करणं योग्य आहे.



माझा दृढ विश्वास आहे की शिक्षण हा गरिबीतून बाहेर निघण्याचा एकमेव मार्ग आहे. आणि मला माहित आहे की मला ज्या संधी मिळाल्या त्या खूप प्रभावी झाल्या नसत्या जर मी त्या घेतल्या नसत्या. २०११ च्या जुलै मध्ये, माझ्या मनात लहानपणच्या शाळेचे पुनर्निर्माण करण्याची योजना आली. मटाऊ प्राथमिक शाळा, ओपरा विनफ्रे, सेव द चिल्ड्रन, आणि इतर लोकांच्या उदार मदतीने आता नवीन वर्ग, खेळाचे मैदान, एक वाचनालय आणि स्वच्छ पाणी देणारी बोअरने सुसज्ज आहे. माई फाउंडेशन, मटाऊ आणि पूर्ण क्षेत्रच्या आसपासच्या समुदायांमध्ये जवळजवळ पाच हजार मुलांना शैक्षणिक संसाधन उपलब्ध करत आहे.

शिक्षक, आई-वडील, नातेवाईक आणि मित्र आमचे सगळ्यात मोठी संपत्ती आहे.

ते आमच्या मुलांच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका निभावू शकतात. मला आशा आहे की ही कहाणी मुलांना स्वप्नं बघण्यासाठी आणि मेहनत करण्यासाठी प्रेरणा देईल.



एका छोट्याश्या मुलीची ही खरी कहाणी जिने एक अशक्य स्वप्नं साकार केले.

प्रेरक आणि खरी कहाणी

